# नागपुर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र

## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपुर.


दिनांक 04/07/2020 (शनिवार)

(सकाळ)

## घरफोडी

पो.स्टे. रामटेक :– अंतर्गत 18 कि.मी अंतरावर शिवनी भोंडकी येथे दिनांक 03/07/2020 चे 12:15 वा. ते 13:30 वा. दरम्यान फिर्यादी नामे– योगेश राजेन्द्र श्रावणकर, वय 39 वर्ष, रा. शिवनी भोंडकी यांचा मुलगा याने राहत्या घराला कुलुप लावुन वांगे तोडण्याकरीता शेतात गेला होता. दरम्यान अज्ञात आरोपीने घराचे कुलुप तोडुन घरात प्रवेश केले. यानंतर आरोपीने घरातील कपाटात ठेवलेले सोन्या–चांदीचे दागिने कि. 9,500/–रू. व भिंतीला लटकवुन ठेवेल्या कपाडयाखाली प्लॉस्टीकच्या पिशवीमध्ये ठवलेले नगदी 50,000/–रू. असा एकुण किमंती 59,500/–रू. चा मुद्देमाल चोरी केले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. रामटेक येथे आरोपीविरुध्द कलम 454, 380 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोउपनि मिना बारंगे हे करीत आहे.

## रेती चोरी करणाऱ्या आरोपीला अटक

पो.स्टे. मौदा :– अंतर्गत 10 किमी अंतरावर भामेवाडा येथे दिनांक 03/07/2020 चे 02.30 वा. दरम्यान आरोपी नामे– 1) सतिश रामेश्वर गभणे, वय 29 वर्ष, 2) अनमोल गणेश मलेवार, वय 19 वर्ष, 3) सोनु वामन बुराडे, वय 32 वर्ष, 4) भोजराज मनिराम मेहर, वय 24 वर्ष, रा. दहेगाव यांनी त्यांच्या 1) एमएच– 36/एए– 4435 क्रमांकाचा ट्रक, 2) एमएच– 36/एए– 1434 क्रमांकाचा ट्रक 3) एमएच– 36/एए– 1471 क्रमांकाचा ट्रक 4) एमएच– 40/एके– 6165 क्रमांकाचा ट्रक प्रत्येकी कि. 20,00,000/–रू. यामध्ये 5 ब्रास रेती कि. 25,000/– चा माल अवैध्य रित्या बिना परवाना गावातुन चोरून नेतांनी गावातील लोकांना मिळुन आले. घटनास्थळावरून वरील 4 ट्रक कि. 80,00,000 तसेच आरोपीची 2 कार कि. 8,00,000 व 5 ब्रास रेती कि. 25,000/–रू. असा एकुण कि. 90,05,000/–रुपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– राजु रामचंद्र उमक, वय 47 वर्ष, रा. वडोदा यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. मौदा येथे आरोपीतांविरुध्द कलम 379, 294, 504, 506 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीतांना अटक आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोहवा कुथे 9764007720 हे करीत आहे.

## विनयभंग

1) पो.स्टे. खापरखेडा :– दि. 20/06/2020 चे 10.00 वा. ते दि. 03/07/2020 चे 14.30 वा. दरम्यान 30 वर्षीय पिडीत/फिर्यादी हि रस्त्याने एकटी जात असतांना आरोपी नामे– पदमाकर गोमाजी गजभिये, रा. वलनी याने जुन्या वादाच्या कारणावरून तिला पाहुन अश्लिल चाळे करून पीडितेस मनास लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य करून तिचा विनयभंग केला. तसेच आरोपीने मोटरसायकलने तिचा पाठलाग करून गाडी रेस करून पीडितेस शिवीगाळ करून मारण्याची धमकी दिली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. खापरखेडा येथे आरोपीविरुध्द कलम 354 (ड),509, 504, 506 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास मसपोनि धुमाळ 9970848688 या करीत आहे.

2) पो.स्टे. केळवद :– दि. 03/07/2020 चे 01.30 वा. दरम्यान 35 वर्षीय पिडीत/फिर्यादी हि घरी जेवण करून आराम करीत असता आरोपी नामे– दिनेश सुखदेव भारती, पिपळा याने तिच्या घरामध्ये प्रवेश केला. यानंतर आरोपीने पीडितेस मनास लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य करून तिचा विनयभंग केला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. केळवद येथे आरोपीविरुध्द कलम 354(ड), 452, 506 भादंवि. सहकलम 8 बाल लैगींक अत्याचार प्रतिबंधक अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास सपोनि सुरेश मट्टामी 7350968100 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर